ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

# कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

शिवाजीनगर, गढी.


## बी.ए.प्रथम वर्ष - पेपर - I

## विषय :- निवडक अभंग (अभंगाविष्कार)


**प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)**

मराठी विभाग

# संत ज्ञानेश्वर - 1275 ते 1296

महाराष्टातील वारकरी संप्रदायातील महत्वाचे संत. भागवत धर्माचा पाया रचण्याचे अभूतपतर्व कार्य त्यांनी केले. अध्यात्माच्या क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, सर्व जातीधर्माच्या लोकांना वारकरी संप्रदायात सामावून घेतले. सर्व सामान्य लोकांना समजेल अशा मराठी भाषेत लेखन करुन मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती साध्या आणि सोप्या भाषेत सांगितली.

**निर्जीव दगडांची काय करिसी सेवा I तो तुज निर्देवा देईल काय II**
**कवणें गुणें भुली पडली गव्हारा I तीर्थाच्या माहेरा नोळखिसी II**
**अष्ठोत्तरशें तीर्थे जयाच्या चरणी I**

या अभंगात ते म्हणतात, अरे वेडया ह्रदयरुपी मंदिरात परमात्मा वास करीत असताना त्याला विसरुन हा दगडच देव आहे असे समजून त्याची सेवा करीत बसला आहेस एकशे आठ तीर्थ ज्याच्या चरणा जवळ आहेत असा परमात्मा तुझ्या ह्रदयातच आहे. तीर्थ भ्रमण करुन काय उपयोग असा संदेश देतात.







❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## ▪ संत नामदेव :- (1270 ते 1350 )

महाराष्टातील वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संतकवी होते. हे मराठीतील पहिले चरित्रकार व आत्मचरित्रकार आणि कीर्तनाच्या माध्यमातून भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत नेणारे आद्य प्रचारक होते. प्रतिकूल परिस्थितीमध्ये महाराष्टाची भावनिक एकात्मता जपण्याचे अवघड काम केले . सगुण भक्तीत रमून निर्गुणाची शिकवण समाजाला देणारे व मानवतेची उपासना करणारे संत म्हणून प्रसिध्द असल्यामुळे त्यांना वारकरी संप्रदायात महत्वाचे स्थान होते.

देहाचें ममत्व नाहीं जों तुटलें I विषयी किटलें मन नाहीं II
तंव नित्य सुख कैसेंनि आतुडे I नेणती बापुडे प्रेमसुख II
मीच एक भक्त मीच एक मुक्ता I म्हणती पतित दुराचारी II
नामा म्हणे तुझे कृपेविण देवा I केंवि जोडे ठेवा विश्रांतीचा II






❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# संत जनाबाई

या वारकरी संप्रदायातील महत्वाच्या संत कवयित्री. संत वाटिकेतील जाईची वेल म्हणून प्रसिध्द. जनबाई स्वत:ला नामयाची जनी म्हणत असे. त्यांचे अभंग सर्वांगसुंदर भावगीतच आहेत. विठ्ठलोपासनेची नामभक्ती आणि स्त्रीमनाचा हळुवारपणा त्यांच्या अभंगात पहाचला मिळतो.

पक्षी जाय दिगंतरा I बाळकांसी आणी चारा II
घार हिंडते आकाशी I झाप घाली पिल्लापासीं II
माता गुंतली कामासी I चित्त तिचे बाळापाशी II
वानर हिंडे झाडावरर I पिली बांधुनी उदरी II
तैसी आम्हांसी विठठल माये I जनी वळोवेळां पाहे II






❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## संत एकनाथ :- ( 1533 ते 1599 )

संत एकनाथ हे संत-पंत-तंतकवी होते. भगवद्भक्तीचा वारसा त्यांच्या घरातूनच मिळाला. ते सदैव विठ्ठलोपासनेत लीन राहायचे. मराठी भाषेत विपूल साहित्य निर्मिती केली. आपल्या साहित्याद्वारे जनतेचे रंजन व प्रबोधन केले. समजातील अनिष्ठ प्रथा, अंधश्रध्दा निर्मुलन आणि जातियतेच्या विरोधात काम करुन डोळस आणि कृतीशील समाज निर्मितीसाठी प्रयत्न केले. ते एका जनार्दन म्हणून स्वत:चा उल्लेख करतात. एका जनार्दनी ही त्यांची नाममुद्रा आहे.

जें जें दृष्टीं दिसे ते ते हरिरुप I पूजा ध्यान जप त्यासी नाही II
वैकुंठी कैलासी तीर्थक्षेत्री देव I तयाविण ठाव रिता कोठें II
वैष्णवांचे गुह्य मोक्षाचा एकांत I अनंतासी अंत पाहता नाही II
आदि मध्ये अंती अवघा हरि एक I एकचि अनेक एक हरि II
एकाकार झाले जीव शिव दोन्ही I एका जनार्दनी ऐसे केले II





प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

**संत तुकाराम** :- (1608 ते 1650 )

वारकरी संप्रदायातील शेवटचे आणि महत्वाचे संत. तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भिड संत कवी होते. त्यांची  अभंग गाथा म्हणजे अखंड ज्ञानाचा स्त्रोत आहे. त्यांचे अभंग महाराष्टाच्या सांस्कृतिक परंपरेचे द्योतक आहेत. आपल्या लेखनीच्या  माध्यमातून  सर्व सामान्य लोकांना नवा धर्म, नवी भाषा आणि नवी दिशा देण्याचे काम यांनी केले. त्यांचे साहित्य म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. आपल्या लेखनीने महाराष्टच्या सांस्कृतिक जीवनाची बाग फुलविली आहे.



जोडोनियां धन उत्तम वेव्हारें I   उदास विचारें वेच करी  II
उत्तम चि गती तो एक पावेल  I उत्तम भोगील जीव खाणी II
परउपकारी नेणें परनिंदा  I  परस्त्रिया सदा बहिणी माया  II
भूतदया गाईपशूचें पालन  I  तान्हेल्या जीवन वनमाजी    II
शांतिरुपें नव्हे कोणाचा वाईट  I  वाढवी महत्व वडिलांचें   II
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ  I  परमपद बळ वैरागयाचें  II




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# धन्यवाद

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग